# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमाक:२अ/एडीएम/प्रनिप्रानोंदणी/२०१९/ ४०१

दिनांक : 2 MAY 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशा करीता नोंदणी प्रक्रियेबाबत**

संदर्भ:-सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.तंशिप्र१२१९ / प्र.क्र.५७/ प्रनिप्रा / ४६७,दि. २२.०५.२०१९

उपरोक्त विषया संदर्भाधीन पत्राची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. कृपया पहावे.

संदर्भाधीन पत्रान्वये राज्यातील खाजगी विनाअनुदानित/शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमांच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर /पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया /प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safaita.org या ऑनलाईन पोर्टलवर दि. २२.०४.२०१९ ते दि. २२.०५.२०१९ या कालावधी मध्ये संस्थाची /अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक कागदपत्रे संबंधित संस्थांनी अप लोड /सादर करणे बंधन कारक होते. तथापि अद्याप अनेक महाविद्यालयांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्याचे दिसून येत आहे. सबब शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांची सदर नोंदणी प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये शुक्रवार दि. ३१.०५.२०१९ रात्री ११.५९ मि. पर्यंत वाढ देण्यात आली आहे.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये जे महाविद्यालय/संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास तसेच आवश्यक कागदपत्रे /माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील अशा महाविद्यालयांचा /संस्थांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही. असे संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तरी सदरबाब आपल्या नियंत्रणाखालील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणावी.

(डॉ. अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत: १) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण , मुंबई यांना माहितीस्तव सादर.

३) कार्यासन अधिकारी कार्यासन क्रमांक २ यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता

४) प्रणाली विश्लेषक कार्यासन क्र. ३ यांना कळविण्यात येते की, सोबत जोडण्यात आलेले संदर्भाधीन पत्र संचालनालयाच्या संकेतस्थळावर सर्व संबंधित संस्थांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्र शासन

प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


**महत्वाचे/कालमर्यादा/ईमेलद्वारे**

क्रमांक. तंशिप्र१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/४६७ दि.२२ मे, २०१९

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी प्रक्रियेबाबत.**

संदर्भ :- १. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/२५३ व २५५, दि.१९ मार्च, २०१९ रोजीची परिपत्रके.
२. तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा/३४२ व ३४३, दि.१८ एप्रिल, २०१९ रोजीची परिपत्रके.

विषयांकित प्रकरणी राज्यातील खाजगी विनाअनुदानित/ शासकीय/ शासन अनुदानित/ महानगरपालिका/ अल्पसंख्यांक आरोग्य विज्ञान/तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण/आयुष शिक्षण/कृषी शिक्षण/कला शिक्षण/पशू व मत्स्य विज्ञान शिक्षण या अभ्यासक्रमांच्या महाविदयालयांना/संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर / पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया/प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या ऑनलाईन पोर्टलवर दि.२२/०४/२०१९ ते दि.२२/०५/२०१९ या कालावधीमध्ये महाविद्यालयांची/अभ्यासक्रमांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे बंधनकारक होते. तथापि, अद्याप अनेक महाविद्यालयांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्याचे दिसुन येत आहे. सबब, शै. वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांची सदर नोंदणी प्रक्रिया अत्यंत आवश्यक असून सदर नोंदणी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी शुक्रवार, दि.३१/०५/२०१९ रात्री ११.५९ मि. पर्यंत वाढ देण्यात येत आहे.

तसेच ज्या महाविद्यालयांना शै. वर्ष २०१९-२० साठी नविन मान्यता प्राप्त झालेली परंतु अद्याप संदर्भाकित परिपत्रकातील नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे प्राप्त झालेली नाहित अशा महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रिया सदरचे कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर करुन घेण्यात येईल.

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये जे महाविद्यालय/संस्था प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यास तसेच उक्त नमूद कागदपत्रे/माहिती सादर करण्यास असमर्थ ठरतील, अशा महाविद्यालयांचा/संस्थांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रकियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी.

मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या आदेशावरुन.

(आ. ए. रायते,) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/संस्था.